माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 8344 दिनांक :- 11/3/25

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका याचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/११२८८ दि.३/०३/२०२५

१. अपिलकर्ता
श्री. अविनाश लहाडे
कार्यालयाचा पत्ता - स.नं. ३६, कात्रज कोंढवा रोड,
परामाउंट गार्डन समोर, शिवशंभो नगर,
लेन न. ४, पुणे ४११०४६
मोबाईल क्र. ८३८१०३८१३८

२. श्री. राजू दुल्लम,
जन माहिती अधिकारी
तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक
पुणे महानगरपालिका

श्री. अविनाश लहाडे
विरूध्द
श्री. राजू दुल्लम, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक,
पुणे महानगरपालिका

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

अपिलकर्ता श्री. अविनाश लहाडे यांचा माहिती अधिकार अर्ज आ.क्र. १०२८५ दिनांक ४/०२/२०२५ अन्वये कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झाला.

अपिलार्थी यांनी कात्रज कोंढवा रोड गोकुळनगर कृष्णसागर हॉटेल च्या चिमणीच्या धुराने प्रदूषण होत आहे. कृष्णसागर हॉटेलचा परवाना रद्द करण्याबाबत व हॉटेल अनधिकृत असल्यास त्यावर कारवाई करण्याबाबत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या नियमावली प्रमाणे हॉटेलचा अद्ययावत केलेला पोल्युशन चाचणीचा अहवाल मिळणे बाबत माहिती अधिकार अंतर्गत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जावर श्री. राजू दुल्लम, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, यांनी जा.क्र. ७६६१ दि. १२/०२/२०२५ अन्वये उत्तर कळविले आहे.

Scanned with ACE Scanner

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्रमांक व दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्रमांक व दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १०२८५ दि.४/०२/२०२५ | ४/०३/२०२५ | जा.क्र. ७६६१ दि. १२/०२/२०२५ | निरंक | जा.क्र. ७६६१ दि. १२/०२/२०२५ |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** - श्री.अविनाश लहाडे यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे-

" कात्रज कोंढवा रोड गोकुळ नगर कृष्णा सागर हॉटेल संदर्भातील माहितीचा अधिकार दि.४/२/२०२५ रोजी आपल्या कार्यालयास अर्ज दाखल केला असून तरी त्या विश्यांकित आपण काय कारवाई केलेली आहे याचे दस्तऐवज मिळण्याबाबत तसेच मागील अर्जावर आपण का कारवाई केली नाही याचे लेखी माहिती मिळण्याबाबत"

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा जावक क्र. दिनांक |
| १२/०३/२०२५ | ३/०३/२०२५ | होय | - | ८१७२ दि. ४/०३/२०२५ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ११/०३/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | अपिलार्थी यांनी कात्रज कोंढवा रोड गोकुळनगर कृष्णसागर हॉटेल च्या चिमणीच्या धुराने प्रदूषण होत आहे. कृष्णसागर हॉटेलचा परवाना रद्द करण्याबाबत व हॉटेल अनधिकृत असल्यास त्यावर कारवाई करण्या बाबत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या नियमावली प्रमाणे हॉटेलचा अद्ययावत केलेला पोल्युशन चाचणीचा अहवाल मिळणे बाबत माहिती अधिकार अर्ज दाखल केला आहे. | जा.क्र. ७६६१ दि. १२/०२/२०२५ अन्वये उत्तर कळविले आहे. |

Scanned with ACE Scanner

विवेचन

माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याने प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचे सांगितले. यावर जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अर्जदार यांना जा.क्र. ७६६१ दि. १२/०२/२०२५ अन्वये उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. तथापि रजिस्टर ए.डी. केलेले पत्र टपालाने परत आल्याचे सांगितले.

यावर जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांनी जा.क्र. ७६६१ दि. १२/०२/२०२५ अन्वये दिलेली माहिती अर्जदार यांना सुनावणी दरम्यान पुनश्च उपलब्ध करून दिली. त्यावर अपिलार्थी यांचे समाधान झाले आहे.

**-: आदेश :-**

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून दिली आहे. सबब सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

( लक्ष्मण कादबाने )
अपिल प्राधिकारी तथा प्र.महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाण: ११/०३/२०२५ , पुणे.

टीप :- १.सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

Scanned with ACE Scanner